सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना निवृत्तिवेतनविषयक लाभ वेळेवर अदा करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग

शासन परिपत्रक, क्रमांक:सेनिवे-१०००/१२०/सेवा-४

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ एप्रिल २०००.

पहा:- 1) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.सेनिवे-१०८५/२०३७-ब/८७/सेवा-४, दिनांक २९.७.१९८६.
२) शासन परिपत्रक , वित्त विभाग, क्रमांक:सेनिवे-१०९०/प्र.क्र.३४१/सेवा-४, दिनांक ६.३.१९९१.
३) शासन परिपत्रक , वित्त विभाग, क्रमांक:सेनिवे-१०९२/७७/सेवा-४, दिनांक १.४.१९९२.
४) शासन परिपत्रक , वित्त विभाग, क्रमांक:सेनिवे-१०९३/२४/सेवा-४, दिनांक१५.४.१९९३.
५) शासन परिपत्रक , वित्त विभाग, क्रमांक:सेनिवे-१०९३/८५/सेवा-४, दिनांक ६.१०.१९९३.
६) शासन परिपत्रक , वित्त विभाग, क्रमांक:सेनिवे-१०९७/२७/सेवा-४, दिनांक ३१.५.१९९७.

## परिपत्रक

नियत वयमान निवृत्तिवेतन ज्या महिन्यात देय आहे त्या महिन्याच्या पहिल्या तारखेपासून देणे शक्य व्हावे यासाठी कार्यालय प्रमुख व निवृत्तिवेतन प्रदान आदेश काढण्यास जबाबदार असणारे इतर अधिकारी यांनी निवृत्तिवेतन व उपदान प्रत्यक्ष देण्याच्या व प्राधिकृत करण्याच्या विविध कार्यपध्दतीबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम १९८२, मधील प्रकरण १० मध्ये विहित केलेले वेळापत्रक पाळणे आवश्यक आहे, ही बाब वर नमूद केलेल्या आदेशांद्वारे कार्यालय प्रमुखांच्या नजरेस आणली असतांना देखील अजूनही निवृत्तिवेतनाची/कुटुंब निवृत्तिवेतनाची प्रकरणे विहित मुदतीत महालेखापालांकडे पाठविली जात नाहीत व त्यामुळे निवृत्तिवेतनधारकांना निवृत्तीच्या दिनांकानंतर बऱ्याच उशीरा निवृत्तिवेतन प्राधिकृत केले जाते व निवृत्तिवेतनधारकांना आर्थिक त्रास सोसावा लागतो. तसेच अशा प्रकरणी विलंबीत रकमेवर व्याज देण्याचा खर्च अंतिमत: शासनास सोसावा लागतो, याची शासनाने गंभीर दखल घेतली आहे.

२. याद्वारे सर्व कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुखांना पुन्हा असे निदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी निवृत्तिवेतनविषयक लाभांच्या प्रकरणांना प्राधान्य द्यावे व अशी प्रकरणे विलंब न होता लवकरात लवकर निकाली काढली जातील याविषयी सर्वतोपरी दक्षता घ्यावी. यादृष्टीने निवृत्तिवेतन व उपदान प्रत्यक्ष देण्याच्या व प्राधिकृत करण्याच्या विविध कार्यपध्दतीबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील प्रकरण १० मध्ये विहित केलेले वेळापत्रक पाळले जाईल, त्याचप्रमाणे यापूर्वी शासनाने वेळोवेळी प्रसृत केलेल्या आदेशांद्वारे निर्देशित केलेल्या विहित कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन केले जाऊन निवृत्तिवेतनविषयक कागदपत्र विहित नमुन्यात सर्वबाबतीत यथोचितरित्या पूर्ण करुन शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या तारखेच्या सहा महिने अगोदर महालेखापालांच्या कार्यालयाकडे पाठविले जातील, तसेच महालेखापालांच्या कार्यालयाच्या संपर्कात सातत्याने राहून त्यांचेकडून प्राधिकारपत्रे वेळीच निर्गमित केली जातील, या सर्वबाबतीत कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख यांनी दक्ष राहणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यास निवृत्तिवेतनविषयक लाभ प्रदान करण्यास विलंब झाला तर संबंधित कार्यालय प्रमुखांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुध्द त्वरीत शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी. त्याशिवाय त्यांच्या गोपनीय अहवालात *"निवृत्तिवेतनाची प्रकरणे निकालात काढण्यास अक्षम्य दिरंगाई झाल्याने शासनास व्याजापोटी आर्थिक झळ बसण्यास जबाबदार आहेत"* - अशा प्रकारची नोंद घेण्यात यावी.

३. तसेच शासन असेही निदेश देत आहे की, मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या संबंधित सचिवांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभागांमधील निवृत्तिवेतनविषयक प्रकरणांवर यथोचितरित्या विहित वेळापत्रकानुसार कार्यवाही होत आहे किंवा कसे याबाबतची शहानिशा करण्यासाठी विभाग प्रमुखांची त्रैमासिक बैठक घेऊन त्यांच्या

एच-262(19000+40-4-00)

(कृ.मा.प.

अधिपत्याखालील विभागातील/कार्यालयातील निवृत्तिवेतनविषयक प्रकरणांचा आढावा घ्यावा. तसेच अशीच त्रैमासिक बैठक घेण्याबाबत त्यांनी विभाग प्रमुखांना निदेश द्यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वसन्त वा. चौधरी,**
शासनाचे उपसचिव.

प्रति,

भारत सरकारचे सचिव, वित्त मंत्रालय, नवी दिल्ली,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१२५ प्रती),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१२५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),
मुख्य लेखा अधिकारी, बी ब्लॉक, दिल्ली प्रशासन, विकास भवन, नवी दिल्ली (५ प्रती),
नियंत्रक, लेखा, परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली (१० प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (५२० प्रती),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १० प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण कुटीर क्र.३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मंत्रालयासमोर, मुंबई,
मंत्रालयातील सर्व विभाग,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (१० प्रती),
कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

---

*पत्राद्वारे

एच-262(19000+40-4-00)अ.